ePaper

संख्याबळ असेल तर जरूर मुख्यमंत्री व्हा! नाना पटोले



| वर्ष - 6 | अंक - 363 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | सोमवार दि. 24 एप्रिल 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आतील पानांत


- आधी मंत्रिमंडळाचा विस्तार करा
- प्रगतीचे चक्र उलटे नका फिरवू ...
- चोरलेलं धनुष्य बाण घेऊन या!


# ‘एक्सप्रेस हायवे’वर आता ‘गोल्डन अवर्स’!

## » महामार्गावरील वाहतूक कोंडीवर तोडगा : आर. के. पद्मनाभन यांचा प्रायोगिक निर्णय

।पिंपरी महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यात शाळा-महाविद्यालयांना उन्हाळी सुट्या आहेत. त्यामुळे द्रुतगती मार्गावर वाहनांची संख्या वाढली आहे. गेल्या आठवडाभरात वाहतूक कोंडीचा सामना करावा लागला. त्यातून मार्ग काढण्यासाठी महामार्ग पोलिसांनी ‘गोल्डन अवर्स’चा तोडगा काढला आहे.**



त्यानुसार सकाळी आणि सायंकाळी ठराविक काळात मल्टी-ॲक्सल वाहने आणि कंटेनरला बंदी असेल. त्या कालावधीसाठी प्रामुख्याने प्रवासी आणि लहान वाहनांना फायदा होणार आहे.

राज्याचे तत्कालीन अतिरिक्त महासंचालक (वाहतूक) आर. के. पद्मनाभन यांनी २०१६ मध्ये वाहतूक कोंडीवर उपाय म्हणून ‘गोल्डन अवर्स’ संकल्पना प्रायोगिक तत्त्वावर सुरू केली होती. खालापूर आणि उर्से टोल प्लाझा येथे विकेंडला तीन-ॲक्सल आणि मल्टी-ॲक्सल वाहनांसाठी द्रुतगती मार्ग सुमारे चार तासांसाठी बंद ठेवला होता.

सध्या सुट्यांचा हंगाम सुरू झाल्याने वाहनांची संख्या वाढली आहे. त्यामुळे बोरघाटात ट्रॅफिक जाम आणि जीवघेण्या अपघातही होत आहेत. वाहतूक सुरळीत करण्याच्या उद्देशाने वाहतूक पोलिसांनी द्रुतगती मार्गावर ‘गोल्डन अवर्स’चा मार्ग काढण्यात येत आहे, अशी माहिती वाहतूक शाखेचे पोलिस उपनिरीक्षक अमोल पवार यांनी दिली.

### काय आहे योजना?

» ‘पिक अवर्स’दरम्यान पुण्याकडे येणाऱ्या वाहनांची संख्या जास्त असल्याने बोरघाटात कोंडी होते. त्यामुळे अवजड ट्रक, कंटेनर, मल्टी-ॲक्सल वाहने खालापूर टोलनाक्यावर पहाटे पाच ते दहा या वेळेत थांबविण्यात येणार आहेत.

» मुंबईच्या दिशेने जाणारी अवजड वाहतूक थांबविण्यासाठी परिस्थिती बघून निर्णय घेतला जातो. रिटर्न वाहतूक वाढल्यास नियंत्रण कक्षाशी संपर्क साधण्यात येतो. त्यानुसार उर्से टोलनाका येथे अवजड वाहतूक थांबविण्यात येते.

# अनधिकृत होर्डिंग जमीनदोस्त!

## » आयुक्त शेखर सिंह यांचे आदेश : 37 पाडले आणखी 35 हटवणार!

। पिंपरी। महाईन्यूज । प्रतिनिधी।

चिंचवड शहरातील न्यायालयात प्रलंबित असलेल्या 433 अनधिकृत होर्डिंग व्यतिरिक्त 72 नव्याने होर्डिंग आढळून आले आहेत. यापैकी 37 अनधिकृत होर्डिंग जमीनदोस्त झाले असून उर्वरित 35 होर्डिंग दोन दिवसात काढण्यात येणार असल्याची माहिती आकाश चिन्ह व परवाना विभागाच्या वतीने देण्यात आली आहे. तसेच न्यायालयात प्रलंबित याचिकेच्या अधिन राहून अनधिकृत फलक धारक व अधिकृत फलक धारकांना लायसन्स प्राप्त संरचना अभियंत्याचे संरचना मजबुतीचे (स्थिरतेचे) प्रमाणपत्र सादर करण्यासाठी 15 दिवसाची मुदत दिली आहे. या मुदतीमध्ये कोणत्याही प्रकारची वाढ होणार नसून दिलेल्या मुदतीमध्येच प्रमाणपत्र सादर करावे, असेही आकाश चिन्ह विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.

किवळे येथे (दि.17) एप्रिल रोजी अनधिकृत फलक पडून पाच जणांचा मृत्यू झाला तर तिघे जखमी झाले आहेत. या घटनेनंतर अनधिकृत जाहिरात फलक व अधिकृत फलकांच्या स्ट्रक्चरल ऑडिट, राज्य सरकारचे जाहिरात धोरणाची अंमलबजावणी करण्यासह अनधिकृत होर्डिंग काढून घेण्यासाठी आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी कठोर पाऊले उचलली आहेत. शहरात न्यायालयात प्रलंबित असलेल्या 433 अनधिकृत होर्डिंग व्यतिरिक्त 72 नव्याने होर्डिंग आढळून आले आहेत. यापैकी रविवारअखेर 33 होर्डिंगधारकांनी स्वतःहून होर्डिंग काढले आहेत. तर 4 पालिकेच्या वतीने होर्डिंग काढले आहेत. उर्वरित 35 होर्डिंग येत्या दोन दिवसात काढण्यात येणार असल्याचे सहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख यांनी सांगितले आहे. शहरातील ज्या होर्डिंगचे मंजुर मोजमापापेक्षा जास्त मोजमाप असल्यास त्वरीत वाढीव मोजमाप स्वतःहून काढून घ्यावे.



> “ न्यायालयात प्रलंबित असलेल्या होर्डिंग व्यतिरिक्त शहरातील सर्व अनधिकृत होर्डिंग तत्काळ जमीनदोस्त करण्याचे आदेश आकाश चिन्ह व परवाना विभागाला दिले आहेत. त्यानुसार परवाना निरीक्षक हे क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या अधिपत्याखालील अतिक्रमण निर्मूलन पथक यंत्र सामुग्रीसह होर्डिंगवर कारवाई करत आहेत. तसेच किवळे येथील घडलेली दुर्घटना मा. उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात येणार आहे. न्यायालयाच्या आदेशानंतर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. मात्र न्यायप्रविष्ट होर्डिंग्ज धारक यांनी स्ट्रक्चरल स्थिरता प्रमाणपत्र देणे आवश्यक आहेच.
>
> – शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक

# आधी मंत्रिमंडळाचा विस्तार करा

## अजित पवार यांचे टीकास्त्र, 23 मंत्र्यांच्या जागा रिकाम्या आहेत

।बारामती।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**नवीन सरकार सत्तेवर येऊन दहा महिन्यांचा कालावधी लोटला तरी अजून मंत्रिमंडळाचा विस्तार होत नाही, 43 मंत्र्यांपैकी फक्त वीस मंत्रीच कामकाज करीत आहेत, 23 मंत्र्यांच्या जागा रिकाम्या आहेत, राज्यमंत्र्यांची नियुक्ती केलेली नाही.**

एकाही महिलेला मंत्रिमंडळात सहभागी करून घेतले नाही, असे असताना राज्य सरकार विविध विषयांवर जनतेचे लक्ष दुसरीकडे वळवण्याचा प्रयत्न करीत आहे, असा आरोप विरोधी पक्ष नेते अजित पवार यांनी केला.

बारामतीत रविवारी (ता.23) माध्यमांशी बोलत होते.

महाविकास आघाडीला भेगा पडू लागल्या आहेत, अशा स्वरूपाची टीका सत्ताधारी पक्षाकडून झाल्यानंतर अजित पवार यांनी आज सत्ताधाऱ्यांवर टीकास्त्र सोडले. ते म्हणाले, लोकांचे लक्ष विचलित करण्यासाठी अवकाळी पावसाने झालेले नुकसान, बेरोजगारी, महागाई, शेतकऱ्यांच्या होणाऱ्या आत्महत्या यासारख्या मूलभूत समस्यांकडे सरकारचे दुर्लक्ष आहे.



दहा महिन्यांचा कालावधी होऊन देखील मंत्रिमंडळातील निम्म्याहून अधिकच्या जागा रिकाम्या आहेत आणि अनेक जिल्ह्यांना पालकमंत्री नाही ही नामुशकी आहे. सरकारने या मूलभूत प्रश्नांकडे लक्ष देण्याऐवजी विरोधकांवर टीका करण्यात अर्थ नाही.

खारघर येथे झालेल्या दुर्घटनेची न्यायालयीन चौकशी व्हायला पाहिजे, कारण प्रशासकीय चौकशी निपक्षपातीपणे होईल अशी स्थिती नाही, त्यामुळेच आम्ही न्यायालयीन चौकशीची मागणी केल्याचे ते म्हणाले.

या सर्व कार्यक्रमाच्या आयोजनामध्ये कमालीचा निष्काळजीपणा झाला हे उघड आहे, यामुळे अनेक निष्पाप लोकांचे मृत्यू झाले, त्यामुळे सरकारने या सर्व प्रकरणाकडे गांभीर्याने पाहावे असे ते म्हणाले. संजय राऊत यांनी 15 ते 20 दिवसात सरकार कोसळेल असे म्हटले आहे, याबाबत विचारता ते म्हणाले माझी व संजय राऊत यांची अलीकडे भेट झालेली नाही, त्यामुळे त्यांना याबाबत काय माहिती आहे याची मला माहिती नाही, त्यामुळे मी याबाबत प्रतिक्रिया देणार नाही.

मुंबईच्या वज्रमूठ सभेला पोलिसांनी परवानगी दिली नाही, याबाबत विचारतात ते म्हणाले की, स्वतः उद्धव ठाकरे यांनी याबाबतची जबाबदारी स्वीकारली आहे ते या संदर्भात संबंधितांशी बोलणार आहेत, त्यामुळे ही परवानगी मिळेल. इतर नेत्यांनी काय मत व्यक्त करावे हा त्यांचा व्यक्तिगत प्रश्न आहे आणि त्यांना ती मत व्यक्त करण्याचा अधिकार आहे, त्यामुळे प्रत्येक वेळेस कोणी काय म्हणाले यावर मी काहीतरी प्रतिक्रिया द्यावी योग्य नाही, असे म्हणत माध्यमांना हेडलाईन्स द्यायला काहीतरी लागते त्यामुळे तुम्ही असे प्रश्न विचारता, अशी नाराजी अजित पवार यांनी यावेळी व्यक्त केली.

### शेतकऱ्यांच्या नुकसानीबाबत विचारा

**कोण काय म्हणाले याबाबतचे प्रश्न विचारण्यापेक्षा सुद्धा राज्यातील बेरोजगारी, महागाई, अवकाळी पावसाने झालेले शेतकऱ्यांचे नुकसान अशा पद्धतीचे प्रश्न विचारले गेले पाहिजेत अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.**

# अधिकारी, कर्मचारी व आडतदार यांच्या मागण्यांना मराठा महासंघाचा पाठिंबा

## मुख्यमंत्र्यांना दिले ॲट्रॉसिटी व विनयभंगाचा गुन्हा रद्द करणेबाबतचे निवेदन

।कात्रज ।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

अखिल भारतीय मराठा महासंघाकडून पुणे कृषी उत्पन्न बाजार समिती अधिकारी व कर्मचारी, आडत्यांवर दाखल करण्यात आलेला ॲट्रॉसिटी व विनयभंगाचा गुन्हा रद्द करणेबाबतचे निवेदन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना देण्यात आले आहे. त्याचबरोबर, अधिकारी, कर्मचारी व आडतदार यांच्या न्यायोचित मागणीस मराठा महासंघाचा जाहीर पाठिंबा घोषित करण्याचे पत्रकदेखिल काढण्यात आले आहे.

पुणे बाजार समितीमधील फळे भाजीपाला विभागात विनापरवाना व बेकायदेशीररित्या लिंबू विक्री करणाऱ्या महिला व इतर व्यापाऱ्यांवर बाजार समिती प्रशासनाने पोलीस बंदोबस्तात सहा महिन्यापूर्वी अतिक्रमण कारवाई केली. या कारवाईत बाजार समितीने केलेल्या चित्रीकरणात कोणत्याही



प्रकारचा गैरप्रकार घडलेला नाही,

असे असताना मार्केट यार्ड पोलीस स्टेशनमध्ये तत्कालीन प्रशासक, अधिकारी, कर्मचारी व आडते यांच्यासह २० ते २५ जणांवर ॲट्रॉसिटी व विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शासकीय कामकाज करत असताना अशा प्रकारचे गुन्हे दाखल करण्याचा प्रकार हा शासकीय अधिकाऱ्यांचे मनोबल खच्चीकरण करण्याचा प्रकार आहे. तरी वरील खोटे गुन्हे रद्द करण्याची मागणी मराठा महासंघाने केली आहे.

अशा प्रकारचे शासकीय कर्तव्य पार पाडत असताना कुठल्याही जातीपातीचा धर्माचा संबंध येत नाही आणि अशा प्रकारचा संबंध जर जाणीवपूर्वक जोडला जात असेल तर प्रशासनाला शासकीय नियम व त्यांचे कर्तव्य पार पाडत असताना अनेक ठिकाणी जातीपातीच्या अडचणी निर्माण होतील व कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल. सदर कर्मचारी व अधिकाऱ्यांवर दाखल केलेले खोटे गुन्हे पोलीस प्रशासनाने तत्काळ मागे घ्यावेत, अन्यथा अखिल भारतीय मराठा महासंघ रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करेल, असा इशाराही या निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

# कोरोना काळात जीएसटीने सावरली राज्यांची अर्थव्यवस्था: दीपक केसरकर

।पुणे ।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

"कोरोना काळात केंद्र सरकारने राज्यांना वस्तू व सेवा कर (जीएसटी) भरपाई म्हणून मोठी रक्कम दिली आहे. त्यामुळेच कोरोना काळातही केवळ या जीएसटीमुळे अनेक राज्यांची अर्थव्यवस्था सावरली गेली. हेच आपल्या अर्थ व्यवस्थेचे वैशिष्ट्य आहे," असे शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी सांगितले.

आर्यन्स ग्रुप ऑफ कंपनीज्च्या वतीने जगजीवन काळे लिखित 'अर्थसंकल्प सर्वसामान्यांसाठी' या पुस्तकाचे प्रकाश केसरकर यांच्या हस्ते रविवारी झाले. यावेळी राज्याचे शिक्षण आयुक्त सूरज मांढरे, ज्येष्ठ पत्रकार यमाजी मालकर, 'आर्यन्स ग्रुप'चे मुकुंद जगताप, अजय जगताप, ईश्वर वाघमारे आदी मान्यवर उपस्थित होते.

केसरकर म्हणाले, "अर्थ संकल्प हा क्लिष्ट असतो, तो सोप्या भाषेत मांडल्यास लोकांना



तो कळतो, त्यातील त्रुटी समोर येतात. अर्थसंकल्प हा सर्व सामान्य नागरिकांना न्याय देण्याचे एक माध्यम आहे. अर्थसंकल्पामध्ये देशाची प्रगती ठरलेली असते. सध्या आपल्या देशाची अर्थव्यवस्था टेक ऑफ घेण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. पूर्वीच्या सरकारने केलेल्या सगळ्याच गोष्टी काही वाईट नव्हत्या.

माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी दिलेल्या काही चांगल्या गोष्टी तशाच पुढे नेण्याचा मोठेपणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दाखविला आहे." कार्यक्रमात मालकर यांनी अर्थसंकल्प आणि सर्व सामान्यांचे नातेसंबंध याबाबत विचार मांडले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वाघमारे यांनी केले.

# सोसायट्यांना टँकरचा 'आधार'!

## पाणी पुरवठा नियोजनाचा अभाव : 40 टक्के पाण्याची गळती

। पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या ३० लाखांवर आहे. पाण्याची गरज भागवण्यासाठी महापालिका प्रतिदिन ५१० एमएलडी (दशलक्ष लिटर) पाणी पवना नदीतून व ३० एमएलडी एमआयडीसीकडून घेत आहे. ५४० पैकी ४० टक्के म्हणजे २१६ एमएलडी पाणी गळती व चोरी होत असल्याचे प्रशासन गेल्या पाच वर्षापासून सांगते आहे. मात्र, त्यावर ठोस उपाय अद्याप सापडत नाही, अशी स्थिती आहे.**



केवळ, २४ बाय सात योजनेअंतर्गत काम करताना अनधिकृत नळजोड अधिकृत होतील व पाणी चोरीला आळा बसेल, असा दावा केला जात आहे. हे कामही अद्याप अपूर्णच आहे. शिवाय, साडेतीन वर्षांपासून दिवसाआड पाणीपुरवठा होत आहे. तोही अनियमित, अपुरा व कमीदाबाने होतो. सोसायट्यांतील नागरिकांना टँकरचा आधार घ्यावा लागत आहे. त्यांना मात्र मुबलक पाणी मिळते. त्यामुळे महापालिकेने प्रभावी उपाययोजना करण्याची गरज आहे. सध्या उन्हाळा आहे, पाण्याची मागणी वाढली आहे. येत्या पावसाळ्यावर एल निनो वादळाचा प्रभाव राहणार असल्याने पाऊस कमी होण्याची शक्यता आहे. त्याचा परिणाम शहराच्या पाणीपुरवठ्यावरही होऊ शकतो. त्या पार्श्वभूमीवर व सद्यःस्थितीत शहराच्या त्या विविध भागातील पाणी प्रश्नाचा आढावा घेतला असता, अनेक भागात अपुरा व कमी दाबाने पाणीपुरवठा होत असून टँकर लॉबीचा सुळसुळाट झाल्याचे दिसून आले. टँकर माफियांनी पाण्याच्या व्यवसायातून कोट्यवधी रुपये कमविले आहेत. त्यामुळे ही पाणी टंचाई या लॉबीला पोसण्यासाठी तर केली जात नाही ना, असा सवाल नागरिक उपस्थित करू लागले आहेत.

### पवना धरणात जुलैअखेरपर्यंतचा साठा

**» शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या मावळ तालुक्यातील पवना धरणात रविवारपर्यंत (ता. २३) ३९.३७ टक्के साठा शिल्लक राहिला आहे. गेल्या वर्षी याच दिवशी ३९.६८ टक्के पाणीसाठा होता, तो जुलै अखेरपर्यंत पुरण्याची शक्यता आहे. मात्र, सध्याच्या तीव्र उन्हामुळे पाण्याचे बाष्पीभवन होऊन पाणीसाठा आणखी कमी होऊ शकतो. सद्यःस्थितीत शहराला दैनंदिन पाणीपुरवठ्याचा मुख्य स्रोत केवळ पवना धरण आहे. त्यातून सोडलेले पाणी नदीतून वाहत येऊन रावेत जवळ बंधारा बांधून अडवले आहे. तेथून अशुद्ध जलउपसा करून जलवाहिनीद्वारे निगडी प्राधिकरणातील सेक्टर २३ मधील जलशुद्धीकरण केंद्रात नेले जाते. तेथून शहराच्या विविध भागात पाणी वितरण केले जाते. मात्र, २५ नोव्हेंबर २०१९ पासून दिवसाआड पाणीपुरवठा केला जात आहे.**

# शिवाजीनगर- लोणावळा लोकल प्रवासी वाढले!

## रेल्वे प्रशासनाची माहिती : प्रतिदिन सुमारे 5 हजार प्रवासी

।पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शिवाजीनगर येथील लोकल टर्मिनल सुरू केल्यानंतर पुणे-लोणावळादरम्यान धावणाऱ्या सहा लोकल गाड्यांना प्रवाशांचा प्रतिसाद वाढला आहे. या लोकल गाड्यांची प्रवासी संख्या २३ टक्क्यांनी वाढली असल्याची माहिती रेल्वे प्रशासनाकडून देण्यात आली आहे.**

पुणे स्टेशनवरील ताण कमी करण्यासाठी रेल्वे प्रशासनाने शिवाजीनगर लोकल टर्मिनल विकसित केले. या ठिकाणी लोकलसाठी एक स्वतंत्र लाईन टाकण्यात आली आहे. त्या ठिकाणाहून ६ फेब्रुवारी २०२३ पासून सहा लोकल सुरू करण्यात आल्या आहेत. पुणे स्टेशन येथून पुणे लोणावळा दरम्यान ४० लोकल धावत होत्या. त्यापैकी सहा लोकल शिवाजीनगर लोकल टर्मिनल येथून सोडण्यास सुरुवात केली. पुणे स्टेशनवरील लोकल गाड्या शिवाजीनगर येथून सोडण्यास सुरुवात केल्यानंतर प्रवाशांनी विरोध केला होता. त्या गाड्या पुणे स्टेशन येथूनच सोडण्याची मागणी लावून धरली होती. पण, रेल्वे प्रशासनाने येथून हळूहळू गाड्या वाढविल्या. त्यामुळे प्रवाशांना आता शिवाजीनगर येथून जाणाऱ्या लोकलची सवय झाली आहे. प्रवासी संख्या दिवसेंदिवस वाढत आहे.

**प्रत्येक महिन्यात वाढता प्रतिसाद...**
पुणे स्टेशन येथून सहा लोकल धावत असताना त्यांना दिवसाला साधारण चार हजार ६४ प्रवासी मिळत होते. पण, याच गाड्या शिवाजनगर लोकल टर्मिनल येथून सोडण्यास सुरुवात केल्यानंतर दिवसाला प्रवासी संख्या पाच हजारांपर्यंत पोहोचली आहे. गेल्या दोन महिन्यात शिवाजीनगर येथून पुणे लोणावळा दरम्यान धावणाऱ्या सहा लोकलमधून दोन लाख ९३ हजार प्रवाशांनी प्रवास केला आहे.




### लोकलची दिवसाला सरासरी प्रवासी संख्या



» ४,०६४
जानेवारीतील दिवसाला सरासरी प्रवासी

» ४,८२१
फेब्रुवारीतील दिवसाला सरासरी प्रवासी

» ४,९८७
मार्चमधील दिवसाला सरासरी प्रवासी



# सकस साहित्य सुदृढ समाजमन घडवते!"

## चिंचवडगावात पुस्तक प्रदर्शन

।पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

"सकस साहित्य सुदृढ समाजमन घडवते. (PIMPRI) वाचनाने जीवनातील सर्व प्रकारचे ताणतणाव कमी होऊन व्यक्तिमत्त्व विकसित होते!" असे विचार ज्येष्ठ साहित्यिक अरुण बोऱ्हाडे यांनी व्यक्त केले. गोखले हॉल, चिंचवडगाव येथे शनिवार, दि. 22 एप्रिल 2023 रोजी अक्षय्य तृतीया आणि जागतिक पुस्तकदिनाचे औचित्य साधून अक्षरग्रंथ या संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या दहा दिवसीय पुस्तक प्रदर्शनाचे उद्घाटन करताना अरुण बोऱ्हाडे बोलत होते. यावेळी माजी महापौर संजोग वाघेरे – पाटील, ज्येष्ठ साहित्यिक श्रीकांत चौगुले, इतिहास अभ्यासक संदीप तापकीर आणि ब. हि. चिंचवडे यांची व्यासपीठावर तसेच ह. भ. प. किसनमहाराज चौधरी, एव्हरेस्टवीर श्रीहरी तापकीर, प्रकाशक नितीन हिरवे, ज्येष्ठ कवयित्री शोभा जोशी, जलसंपदा अभियंता ज्ञानदेव काळे यांची सभागृहात प्रमुख उपस्थिती होती. श्रीकांत चौगुले यांनी, "ढवळे ग्रंथयात्रेपासून मराठी साहित्यविश्वात ग्रंथ प्रदर्शनाची सुरुवात झाली.




# प्रगतीचे चक्र उलटे नका फिरवू ...

**देशाचे प्रधानमंत्री म्हणून नरेंद्रभाई मोदी यांनी सूत्रे हाती घेतल्या पासून म्हणजे २०१४ पासून लोकाभिमुख निर्णय आणि अधिक लोकप्रिय गोष्टींवर भर द्यायला सुरुवात केली आहे. त्यांच्या आधी १० वर्ष सत्तेवर असणाऱ्या काँग्रेसलाही ते शक्य होते मात्र डॉ. मनमोहन सिंग यांची प्रकृती गंभीर होती म्हणजे ते कधी हसताना देशाने बघितलेच नाहीत. त्यांचा चेहरा नेहमी चिंतेत असणाऱ्या कुटुंप्रमखासारखा भासत होता. त्यामुळे सतत तणावात असणारे प्रधानमंत्री आपण सहन केले.**

२०१४ नंतर कोणत्याही गोष्टीवर हसणारा नव्हे कुणाचीही खिल्ली उडवणारा व्यक्ती आपण त्या पदावर सहन करीत आहोत. मोदी ज्या संघ परिवाराच्या विचारांचे प्रतिनिधित्व करतात त्या परिवाराला वर्तमान कमी अन भूतकाळात जगण्यात,रममाण होण्यात आनंद वाटतो. गेल्या ९ वर्षाच्या काळात रस्ते,योजना आणि काही सरकारी खात्यांची नावे त्यांनी बदलून टाकली त्यावर नजर टाकली तर असे लक्षात येते की जुनी नावे त्यांना खूप आवडतात. अपंगाला दिव्यांग म्हणणे , अमृत योजना,अमृतकाळ ,आयुष मंत्रालय ही त्याची काही उदाहरणे आहेत. संघ परिवाराच्या मुशीत ज्या नावांचा बोलबाला असेल ती नावे वापरण्यावर भाजप सरकार अधिक भर देताना दिसत आहे.

त्यांच्याच पावलांवर पाऊल टाकत राज्याचे महिला व बालविकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी मागच्या आठवड्यात असाच एक खुटेउपाड प्रयत्न करून बघितला. विधवा महिलांना यापुढे श्रीमती न म्हणता गंगा भागीरथी असे म्हणावे असे एक पत्र त्यांनी आपल्या खात्याला पाठवून खडा टाकून बघितला मात्र राज्यात त्याचा एवढा विरोध झाला की लोढा याना दुसऱ्याच दिवशी घुमजाव करण्याची पाळी आली. खरतर प्रत्येक खात्यात विकासाची कामे भरपूर असतात , त्या खात्याला एखाद्या मंत्र्याने ठरविले तर अतिशय वेगवान बनवू शकतो मात्र प्रत्येकाला दिसणारे आणि चर्चा होणारे काम अपेक्षित असते. कमी कामात भपूर प्रसिद्धी कशी मिळेल यावर प्रत्येकाचा कटाक्ष असतो हे या निमित्याने दिसून आले. लोकांच्या जीवन मरणाचे अजूनही हजारो विषय फायलींमध्ये दाबून असताना सवंग लोकप्रियता मिळविण्याच्या मागे अनेक मंत्री लागले आहेत.



विधवा महिलांना गंगा भागीरथी म्हणावे का? असे महिला बालकल्याण मंत्री यांचे पत्र एकाचवेळी हास्यास्पद व चुकीचा दृष्टीकोन असणारे आहे. अपंगांना दिव्यांग म्हणा, दलितांना हरिजन म्हणा हे शब्द बदलून वास्तव बदलते का? शब्द टोचण्यापेक्षा तुम्हाला वास्तव टोचले पाहिजे. ते बदलण्याचा प्रयत्न केला पाहिजे.मात्र भाजप किंवा संघ परिवाराला एखाद्या प्रश्नावर कायमचे उत्तर शोधायचे नसते त्यांना वरवर मलमपट्टी करून वेळ मारून न्यायची असते हे आता आपुन राहिले नाही.वास्तविक विधवा शब्द जर त्यातील अपमानकारक सामाजिक वास्तव बदलले तर खटकणार नाही. तो वैवाहिक स्थिती सांगणारा शब्द आहे. जसे घटस्फोटित, परित्यक्ता शब्द आहे तसा हा शब्द आहे. पण त्या महिलांना इतके अपमानाचे जिणे जगावे लागले की त्या शब्दाची भीती वाटायला लागली. ते वास्तव बदलण्यापेक्षा मग शब्द बदलून समस्या सोपी केली जाते.   गंगा भागीरथी हे तर अधिक हास्यास्पद आहे. म्हणजे पतीचे निधन झाले की महिला नदीइतकी पवित्र होते? मग पती असताना मग ती कोणती नदी असते? स्त्रियांचे असे सतत वेगवेगळे दैवतीकरण करायचे आणि दुसरीकडे मात्र वास्तव तसेच ठेवायचे, असा हा आपला सामाजिक सरकारी व्यवहार आहे,स्त्रीचा पती मेल्यावर तिने गंगेवर जाऊन केशवपन करायचे म्हणजे टक्कल करून पुढचे जीवन अतिशय वाईट पद्धतीने जगावे अशी मनुस्मृती सांगते. आजचे महिला बालविकास मंत्रीही त्याच मार्गाने जात असतील तर भाजपला समाजाला कुठे न्यायचे आहे हे स्पष्ट दिसून येते. समाजात आजच्या घडीला विधवा आणि निपुत्रिक स्त्रियांचे जे स्थान आहे त्याला नक्कीच आपले धर्मग्रंथ आणि धार्मिक संस्कार कारणीभूत आहेत. धार्मिक ग्रंथात अश्या स्त्रियांना कोणत्याही आनंदाच्या सोहळ्यात सहभागी करून घेऊ नये अश्या आज्ञा आहेत आणि ९० टक्के समाज त्या आज्ञा पालन करीत असतात. सरकार नावाच्या व्यवस्थेने वाईट प्रथा बंद करायच्या असतात आणि त्याजागी समाजाला नवे पर्याय देत चार पावले पुढे घेऊन जायचे असते. जे कधीच भारतीयांना आवडले नाहीत त्या इंगर्जांनी आपल्या देशातील अनेक वाईट प्रथा कायदा करून बंद केल्या. सामाजिक सुधारणेला महत्व दिले. हे करताना त्यांचे भारतावर प्रेम होते असे नक्कीच म्हणता येणार नाही मात्र त्यांच्यात मानवता कार्यरत होती असे म्हणण्यास नक्कीच वाव आहे. आपल्या देशातील मोठमोठ्या तीर्थक्षेत्रांवर असणाऱ्याविधवा आश्रमात स्त्रियांची काय अवस्था आहे हे सरकारला दिसत असतानाही त्याच्या जगण्यात फरक पडेल असे काहीही न करता विधवेचे नाव बदलण्याची उठाठेव करायला हे सरकार निघाले आहे. अपंगाला दिव्यांग म्हटल्याने त्याच्या जीवनात कोणता फरक पडला ? त्याचे कोणते अंग दिव्य झाले ?

याचे उत्तर अजूनही केंद्र सरकारच्या कोणत्याही मंत्र्याकडे नसताना विधवेला कशाला गंगा भागीरथी करता ?


## संपादकीय »

### लोकसंख्यावाढीचा ब्रम्हराक्षस

***काही देश विकासाच्या बाबतीत पुढे असतात, तर काही आर्थिक... काही साक्षरतेत पुढे असतात, तर काही तंत्रज्ञानाच्या बाबतीत..***

आपला भारत मात्र लोकसंख्येच्या बाबतीत अव्वल ठरला आहे. बलाढ्य चीनला मागे टाकत भारताने नकोसा असलेला विक्रम नोंदवला आहे. युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन फंडने (यूएनएफपीए) यासंदर्भातील ताजी आकडेवारी जाहीर केली आहे. या आकडेवारीनुसार भारताची लोकसंख्या १४२८. ६ दशलक्षांवर गेली आहे. म्हणजेच भारतात आता चीनपेक्षा सुमारे ३० लाख लोक जास्त असले तरी, ही तफावत पुढे विस्तारत जाणार आहे. या अहवालानुसार २०५० पर्यंत चीनची लोकसंख्या आणखी कमी होऊन १३१ कोटी, तर भारताच्या लोकसंख्येत वाढ होऊन ती १६६ कोटी झालेली असेल. मुंबईची लोकसंख्या ४.२४ कोटी झालेली असेल. वास्तविक, भारताची लोकसंख्या २०२८ पर्यंत चीनपेक्षा अधिक असेल.

**जिथे जिथे अडते तिथे तिथे प्रत्येकाला मार्ग शोधून देणाऱ्यांचे काम अजूनही पुस्तकच करीत आहेत. पुस्तकाच्या योग्य मार्गदर्शनामुळे, विश्वासामुळे प्रत्येकाला आजही जीवन जगणे सुसह्य होत आहे. प्रत्येकाच्या मनाचे, बुद्धीचे टॉनिक आणि आदर्श गुरुस्थानी असणारे पुस्तकच आहे.**



## पुस्तक खरा मित्र

प्रत्येकाच्या जीवनाची स्वप्ने जर कुणी पूर्ण केली असतील ना तर ती या पुस्तकांनीच!सर्वसाधारण घरात कुणीही जास्त शिकलेले नसल्यामुळे आणि कुटुंबात बापाच्या कामावरच घरातली सात-आठ माणसे जगत असल्यामुळे कधी कधी कुटुंबावर उपासमारीची वेळ यायची. त्यामुळे प्रत्येकाच्या बापाला नेहमी वाटायचे की, मी शिकलो नसल्यामुळे जे दारिद्र्य माझ्या वाट्याला आले ते माझ्या लेकरांच्या वाट्याला येऊ नये. हा विचार सतत प्रत्येकाच्या बापाला विचार करायला भाग पाडायचा. मग त्याने गावात असलेल्या जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत आपल्या लेकराचं नाव टाकलं आणि पाटी, लेखणी, पहिलेचे मराठीचे पुस्तक, उजळणी, बाराखडीचे पुस्तक घेऊन आपल्या लेकराला शाळेला पाठवून दिले. बाई, कसंही करा पण माझ्या लेकराला शिकवा. तुम्ही काहीतरी शिकवलं तरच तो पुढं भविष्यात पोटभर खाईल, असं म्हणून प्रत्येकाचा बाप निघून गेला आणि प्रत्येक जण वर्गात आसनपट्टीवर हातात पाटी घेऊन पुस्तकांसोबत धडे गिरवू लागला.

तेव्हापासून प्रत्येकानं ठरवून टाकलं की आपल्याला जर दारिद्र्यापासून सुटका करायची असेल तर शिकलंच पाहिजे आणि शिकून सवरून शहाणं व्हायचं असेल तर पुस्तकांशी जवळीकता साधलीच पाहिजे.

मग दिवसामागून जस जसे दिवस जात होते तस तसे पुस्तकांवरचे प्रेम अधिकच वाढत होते. अक्षर ओळख झाल्याने पुस्तकातील धडे, कविता वाचता येऊ लागल्या आणि पुस्तकाच्या सोबतीने पाटीवर उत्कृष्ट पद्धतीने लेखणीने लिहायलाही जमू लागले. तेव्हापासून मग प्रत्येकाच्या जीवनाचं एकचं सूत्र तयार झालं आणि ते म्हणजे पुस्तक. प्रत्येकाने अगदी लहानपणी कुणाशी मैत्री केली नसेल, मात्र या पुस्तकांशी केली.शाळेमधील वाचनालयातील गुरुजींनी वाचण्यासाठी आणि घरी घेऊन जाण्यासाठी पुस्तकांची अनेक रूपे दिली. अनेक कथा, गोष्टी, कविता, कादंबऱ्या हळूहळू वाचायला लावल्या. पुस्तकाला तर हातातून सोडावेसे वाटत नव्हते.सतत पुस्तक घेऊन बसतो, पण शेवटी कुणीच काही बोलत नव्हते. मुकाट्याने घरच्यांच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करून पुन्हा पुस्तक घेऊन वाचायचे. पुस्तक अगदी प्रत्येकासाठी सखा बनला होता. सर्वांना कळायला लागले की पुस्तक जीवनाला खरी दिशा देण्याचे काम करतेय. पुस्तक जणू शिक्षकाची भूमिका पार पाडतेय. पुस्तकांनी कधीच कुणाला फसवले नाही. पुस्तक सर्वांसाठी जीवनातील अंध:कार दूर करण्यासाठी सदैव दिव्याप्रमाणे ज्ञानरूपाने तेवत राहिले .

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥


**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# चोरलेलं धनुष्य बाण घेऊन या!

## माझ्या नावासह मैदानात येतो, निवडणुका लावा, उद्धव ठाकरेंचं चॅलेंज

। जळगाव ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।



**उद्धव ठाकरे यांनी जळगाव जिल्ह्यातील पाचोरा येथे बोलताना एकनाथ शिंदे, त्यांचे समर्थक आमदार आणि भाजपवर हल्लाबोल केला. केंद्रीय निवडणूक आयोगाचा निर्णय, शेतकरी आत्महत्येचा प्रश्न, महागाईचा मुद्दा उद्धव ठाकरे यांनी मांडला. उद्धव ठाकरे यांनी हा सगळा जल्लोष पाहिल्यानंतर शिवसेना कुणाची हे दिसतंय ना, पाकिस्तानला विचारलं तरी ते सांगतील शिवसेना कुणाची पण मोतीबिंदू झालेल्या निवडणूक आयोगाला ते दिसत नसेल, निवडणूक आयोगाचा धृतराष्ट्र झालेला आहे पण हा छत्रपती शिवाजी महाराजांचा महाराष्ट्र आहे.**

महाराष्ट्र सगळं बघतोय सभा हाऊसफूल होत आहेत, अशी टीका ठाकरे यांनी केली. उद्धव ठाकरे यांनी आगामी काळात संपूर्ण महाराष्ट्र पिंजून काढणार असल्याचं जाहीर केलं. भाषणात उद्धव ठाकरे यांनी विविध मुद्यांवरुन राज्य सरकारवर हल्लाबोल केला.

काही जणांना वाटत होतं, ते म्हणजे शिवसेना पण, काही जणांनी सभेत घुसण्याची घोषणा केली होती. निवडणुकीच्या काळात अशा घुशींना मतदानातून उचलून आपटायचं आहे, असं उद्धव ठाकरे म्हणाले. ४० गद्दार, हरामखोर गेला तर फरक पडत नाही, पण जेव्हा एक विश्वासू माणूस जातो त्यावेळी खड्डा पडतो. वैशाली पाटील यांनी जुनी आठवण सांगितली. महाविकास आघाडीचं सरकारनं नैसर्गिक आपत्तीच्या काळात शेतकऱ्यांना मदत केली आहे. यांच्या अवकाळी सरकारनं शेतकऱ्यानं मदत केली नाही, असं उद्धव ठाकरे म्हणाले. सध्या सरकारविरोधात किंवा सत्य बोललं की सरकार लोकांना आत टाकत आहे. आपण त्यांना काही दिलं नव्हतं. आज माझ्याकडे काहीच नाही, शिवसेना नाव चोरलं, धनुष्यबाण चोरलं, वडील चोरत आहेत, तरी देखील तुम्ही आला आहात. तुमचे आशीर्वाद देणारे आहेत त्यामुळं कुणामध्ये हिम्मत आहेत, त्यांनी येऊन दाखवा, असं उद्धव ठाकरे म्हणाले.

### उद्धव ठाकरेंनी मांडली शेतकऱ्याची व्यथा

- झाल्या असतील तुमच्या वाऱ्या, तर या जरा आमच्या बांध्यावरती
- अनाथांच्या नाथा झाल्या असतील तुमच्या वाऱ्या, तर या जरा आमच्या बांध्यावरती
- तुमचं सगळं चाललं असेल ओकेमंधी पण आमच्या कापसाला भाव कधी?

### निवडणुका लावा. मशाल घेऊन येतो

मी घरी बसून महाराष्ट्र सांभाळत होतो, म्हणून ही जनता इथं आली आहे. निवडणूक कधी पण लागेल, गद्दारांना तुम्हाला गाडावं लागेल. न्यायदेवता न्याय नक्कीच देईल. राहुल गांधी यांनी अदानींवर प्रश्न विचारले तर त्यांची खासदारकी घालवली, असं उद्धव ठाकरे म्हणाले. तुम्ही चोरलेलं धनुष्यबाण घेऊन या, मी माझं नाव घेऊन येतो असं आव्हान उद्धव ठाकरे यांनी दिलं. पावसाळ्यापूर्वी काय आता निवडणुका लावा. मशाल घेऊन येतो. महाराष्ट्र हा गद्दारांचा होऊ शकत नाही ती वीरांचा आहे, असंही ते म्हणाले.

### आव्हान द्यायला मर्द असायला लागतं

**आपल्यासमोर भाजप आव्हान हे बिल्कुल नाही. भाजप राज्यात आणि केंद्रात सत्तेवर असेल तोपर्यंत देशाचं होणारं नुकसान कसं भरुन काढायचं हे आव्हान आहे, असं उद्धव ठाकरे म्हणाले. उद्धव ठाकरे यांनी त्यांच्या भाषणात शेतकरी आत्महत्येचा विषय मांडला. सगळे गुलाबो गँग नसतात काही जण संजय राऊतांसारखे मर्द असतात. नितीन देशमुख, राजन साळवी, वैभव नाईक यांच्यामागं चौकशीचा ससेमिरा लावला आहे. आव्हानं कसली देता, आव्हान द्यायला मर्द असायला लागतं, असं उद्धव ठाकरे म्हणाले.**

### “निवडणूक आयुक्तांचा धृतराष्ट्र झालाय”

“पाकिस्तानला विचारलं शिवसेना कोणाची, ते सुद्धा सांगतील. पण, आमच्याकडं मोतीबिंदू झालेल्या निवडणूक आयुक्तांना दिसलं नाही. त्यांचा धृतराष्ट्र झालाय. मात्र, हा शिवरायांचा महाराष्ट्र आहे, हे त्यांनी ओळखलं नाही,” असेही उद्धव ठाकरेंनी म्हटलं आहे.

### “जसं घोड्यावर चढवलं होतं ना, तसं...”

“निवडणूक आल्यावर तुम्ही प्रचार करता, मरमर राबता आणि हे पिकोजी वरती बसतात. संजय राऊत ‘गुलाबो गँग’ म्हणतात. यांना वाटतं आपण घोड्यावर बसलो. घोड्यावर बसल्यावर लाथा सुद्धा लोकांनी खायच्या आणि तुम्ही आरामत बसायचं, हे आता चालणार नाही. जसं घोड्यावर चढवलं होतं ना, तसं आता पुन्हा खाली खेचण्याची वेळ आली आहे,” असं उद्धव ठाकरेंनी सांगितलं.

### “भगव्याला कलंक लावणाऱ्यांना धुवायचं आहे”

“निवडून दिलेले गद्दार झाले, पण निवडून देणारे आजही माझ्याबरोबर आहेत. ज्यांनी आपल्या भगव्याला कलंक लावला तो कलंक धुवायचा आहेत. तो कलंक लावणारे हात राजकारणात कायमचे गाढून टाकायचे आहेत,” असं टीकास्र उद्धव ठाकरेंनी शिंदे गटावर सोडलं आहे.

# “...मग फडणवीसांच्या गळ्यात मंगळसुत्र बांधा”

## संजय राऊतांच्या टीकेला राधाकृष्ण विखेंचं प्रत्युत्तर

। मुंबई ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

राज्याचे महसूल मंत्री आणि भाजपा नेते राधाकृष्ण विखे पाटील यांनी भाजपा नेत्यांच्या मनातील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस असल्याचं वक्तव्य केलं. यानंतर शिवसेनेचे (ठाकरे गट) खासदार संजय राऊतांनी असं असेल तर मग फडणवीसांच्या गळ्यात मंगळसूत्र बांधा, असा खोचक टोला लगावला. याला आता राधाकृष्ण विखेंनी प्रत्युत्तर दिलं आहे. ते रविवारी (२३ एप्रिल) माध्यमांशी बोलत होते.

राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले, “संजय राऊत यांच्या डोक्यावर परिणाम झाला असं लोक म्हणत होते त्याचं हे उत्तम उदाहरण आहे. मला त्यांना आठवण करून द्यायची आहे की, त्यांनी आमच्या भाजपाचंच मंगळसुत्र घातलं होतं. आता त्यांना त्याचा विसर पडला आहे. म्हणजे लग्न करायचं, आमचं मंगळसुत्रं घालायचं आणि लग्नानंतर दुसऱ्याबरोबर घरोबा करायचा.” “तिथंही त्यांची काय अवस्था आहे. तिथं ते त्यांना नांदवायला तयार नाहीत. त्यांच्या वज्रमुठीला आत्ताच तडे गेले आहेत. निदान ते त्यांना सोडणार नाही याची काळजी त्यांनी घ्यावी. एवढाच माझा त्यांना सल्ला असेल,” अशी टीका राधाकृष्ण विखेंनी केली.





संजय राऊत नेमकं काय म्हणाले होते?

राधाकृष्ण विखे पाटील यांनी आमच्या मनातील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आहेत असं मत व्यक्त केलं होतं. यावर प्रतिक्रिया देताना संजय राऊत म्हणाले, “देवेंद्र फडणवीस भाजपा नेत्यांच्या मनातील मुख्यमंत्री असतील तर त्यांनी फडणवीसांना मुख्यमंत्रीपदावर बसवावं. त्यांना कुणी थांबवलं आहे. तुमच्या मनात वेगळा आहे आणि तुम्ही दुसऱ्याबरोबरच नांदत आहात. हा व्यभिचार आहे.” लग्न एकाबरोबर आणि दुसऱ्याबरोबर संसार करत आहेत. यासारखा व्यभिचार नाही. राधाकृष्ण विखे पाटील यांनी फडणवीसांच्या गळ्यात मंगळसुत्र बांधावं. आम्ही कुठं आडवलं आहे. आम्हालाही चालतील,” असा खोचक टोला संजय राऊतांनी लगावला होता.

### “राऊतांच्या भंपक विधानाला मी उत्तर देण्याची गरज

**विखे पुढे म्हणाले, “संजय राऊत यांच्या भंपक विधानाला मी उत्तर देण्याची गरज नाही. सरकारमध्ये एकनाथ शिंदेंच्या रुपात एक कार्यक्षम मुख्यमंत्री आहे. आत्ताही आमचंच सरकार आहे आणि २०२४ मध्येही आमचंच सरकार असेल. या सरकारला विश्वनेता म्हणून जगाने गौरवलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं पाठबळ मिळालं आहे.”**

### “संजय राऊत यांचे दिवस भरत चालले आहेत”

**“संजय राऊत यांचे दिवस भरत चालले आहेत. त्यांनी आता वेगळा व्यवसाय शोधला पाहिजे,” असा टोलाही विखेंनी राऊतांना लगावला.**

# राहुल गांधींचा कर्नाटक दौरा!

## विजयपुरामध्ये करणार रोड शो

।नवी दिल्ली महाईन्यूज।

**काँग्रेस नेते राहुल गांधी आज दोन दिवसांच्या कर्नाटक दौऱ्यावर पोहोचणार आहेत. बंगला सोडल्यानंतर त्यांचा दोन दिवसीय कर्नाटक दौरा असणार आहे. यावेळी राहुल गांधी हे बागलकोट जिल्ह्यात बसव जयंती सोहळ्यात सहभागी होतील. कर्नाटक विधानसभा निवडणुकीपूर्वी लिंगायत समाजाला प्रोत्साहन देण्याचा काँग्रेसचा प्रयत्न म्हणून या कार्यक्रमाकडे पाहिलं जात आहे.**



राहुल गांधी विजयपुरा याठिकाणी संध्याकाळी ५ वाजताच्या सुमारास रोड शो करणार आहेत. विधानसभा निवडणुकींच्या तारखा जाहीर झाल्यानंतर आठवडाभरातील हा त्यांचा दुसरा कर्नाटक दौरा आहे. यापूर्वी ते १६ एप्रिलला जय भारत रॅलीसाठी कर्नाटकात गेले होते. कोलारमध्येही रॅली त्यांनी घेतली होती. यावेळी राहुल गांधींनी प्रश्न विचारल्यामुळे माझी खासदारकी हिसकावून घेतल्याचे म्हटले होते.

राहुल गांधी थोड्याच वेळात साडे दहा वाजताच्या सुमारास हुबळीमध्ये पोहोचतील. त्यानंतर येथून ते हेलिकॉप्टरने बागलकोट येथील कुडाळ संगम येथे रवाना होतील. कुडाळ संगम हे लिंगायत पंथाचे एक महत्त्वाचे तीर्थक्षेत्र आहे, जे कर्नाटकातील प्रभावशाली सुमदायांपैकी एक आहे. त्यामुळे या ठिकाणी राहुल गांधी बसव मंटपाच्या उत्सव समितीने आयोजित केलेल्या बसव जयंती सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत. त्यांच्यासह काँग्रेस नेते संगमनाथ मंदिर आणि एक्य लिंगाला भेट देणार आहेत.

विजयपुरात राहुल गांधी रोड शो करणार असून शिवाजी सर्कल येथे सभेला संबोधित करतील. त्यानंतर उद्या बेळगाव येथील रामदुर्ग येथे ऊस उत्पादक शेतकऱ्यांशी ते संवाद साधणार आहेत. राहुल गांधींनी १६ एप्रिलच्या कोलार येथील जाहीर सभेत पाच आश्वासनं दिली होती. ती म्हणजे, प्रत्येक कुटुंबाला २०० युनिट मोफत वीज, महिलांना दरमहा २००० रुपये, युवा निधी ३००० रुपये कर्नाटकातील प्रत्येक पदवीधरांना २ वर्षांसाठी दिले जातील. तसेच प्रत्येक डिप्लोमाधारकाला १५००

### राहुल गांधी रोड शो करणार

विजयपुरात राहुल गांधी रोड शो करणार असून शिवाजी सर्कल येथे सभेला संबोधित करतील. त्यानंतर उद्या बेळगाव येथील रामदुर्ग येथे ऊस उत्पादक शेतकऱ्यांशी ते संवाद साधणार आहेत. राहुल गांधींनी १६ एप्रिलच्या कोलार येथील जाहीर सभेत पाच आश्वासनं दिली होती. ती म्हणजे, प्रत्येक कुटुंबाला २०० युनिट मोफत वीज, महिलांना दरमहा २००० रुपये, युवा निधी ३००० रुपये कर्नाटकातील प्रत्येक पदवीधरांना २ वर्षांसाठी दिले जातील. तसेच प्रत्येक डिप्लोमाधारकाला १५०० रुपये अशी आश्वासने त्यांनी दिली आहेत.

# "संकट संपलं, आता कायदेशीर लढाई...",

।नवी दिल्ली। महाईन्यूज।

खलिस्तानी समर्थक आणि वारिस पंजाब दे संघटनेचा प्रमुख अमृतपाल सिंग आज सकाळीच पोलिसांना शरण गेला. पंजाबमधील मोगा जिल्ह्यात त्याने आत्मसमर्पण केले. पंजाब पोलिसांनीही याप्रकरणी पुष्टी दिली असून त्याला आसाममधील डिब्रुगढ येथील तुरुंगात ठेवण्यात आलं आहे. दरम्यान, याप्रकरणी त्याच्या कुटुंबियांकडून प्रतिक्रिया आली आहे.

अमृतपालच्या आत्मसमर्पणामुळे कुटुंबियांनी निश्वास सोडला आहे. "याप्रकरणातील संदिग्धता संपली आहे. त्यामुळे एक मार्ग मोकळा झाला. आता आम्ही कायदेशीर लढा देणार आहोत", अशी प्रतिक्रिया त्याचे निकटवर्तीय सुखचैन सिंग यांनी दिली. तसंच, "अमृतपाल फरार असल्यामुळे त्यांचे कुटुंबीय मोठ्या संकटातून जात होते, हे संकट आता संपले आहे", असंही ते पुढे म्हणाले.

सुखचैन सिंग हे पंजाब सशस्त्र पोलीस दलातून इन्स्पेक्टर पदावरून निवृत्त झाले आहेत. त्यांनी इंडियन एक्स्प्रेसला फोनवरून प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले की, "अमृतपालने आत्मसमर्पण केले आहे. पोलिसांनी त्याला अटक केली आहे. हे आमच्यासाठी फारसं महत्त्वाचं नाही.



# महाराष्ट्रातील सत्तासंघर्षाची धाकधूक वाढली

।नवी दिल्ली महाईन्यूज।



महाराष्ट्रातील सत्तासंघर्षचा निकाल कधी लागेल याकडे सर्वांचेच डोळे लागले आहेत. मात्र सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या घटनापीठातील एक न्यायाधीशांना कोरोनाची लागण झाली आहे. त्यामुळे सरन्यायाधीश चंद्रचूड हे क्वारंटाइन झाले आहेत. परिणामी महाराष्ट्राच्या सत्तासंघर्षाच्या निकालाची धाकधूक आणखी वाढली आहे.सरन्यायाधीश चंद्रचूड यांच्या घटनापीठासमोर सध्या समलिंगी विवाहाला मान्यता द्यावी की नाही या मुद्द्यावर सुनावणी सुरु आहे. सरन्यायाधीश चंद्रचूड यांच्यासह न्या. संजय कृष्णा कौल, न्या. एस. रवींद्र भट, न्या. पी. एस नरसिम्हा व न्या. हिमा कोहली हे या घटनापीठात आहेत. यातील न्या. भट यांना कोरोनाची लागण झाली आहे. सरन्यायाधीश चंद्रचुड व अन्य न्यायाधीश क्वारंटाइन झाले आहेत. समलिंगीची सुनावणी अनिश्चित काळासाठी तहकूब करण्यात आली आहे.

महाराष्ट्राच्या सत्तासंघर्षाची सुनावणी सरन्यायाधीश चंद्रचूड, न्या. एम. आर. शाह, न्या कृष्ण मुरारी, न्या. हिमा कोहली, न्या. पी. एस. नरसिम्हा यांच्या घटनापीठासमोर झाली. यातील न्या. न्या. एम. आर. शाह हे १५ मे २०२३ रोजी निवृत्त होत आहेत. महाराष्ट्राच्या सत्तासंघर्षाचा निकाल १५ मेपर्यंत अपेक्षित आहे. हा निकाल येत्या काही दिवसांत कधीही लागू शकतो, अशी शक्यता वर्तवण्यात येत आहे. काही राजकीय नेते तर शिंदे-फडणवीस सरकार पडणार असा दावा करत आहेत. सत्तासंघर्षाचा निकाल येत्या काही दिवसांत लागू शकतो अशी अपेक्षा असतानाच सरन्यायधीश चंद्रचुड, न्या. पी. एस. नरसिम्हा आणि न्या. हिमा कोहली क्वारंटाइन झाले आहेत. सत्तासंघर्षाच्या निकालाचे टेंन्शन वाढले आहे. गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रात सत्ताबदलाची चर्चा जोरदार सुरु आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह १६ आमदार अपात्र ठरणार, शिंदे-फडणवीस सरकार जाणार, असे तर्क लावले जात आहेत.

# सत्ताधाऱ्यांचा निवडणूक अधिकाऱ्यांवर दबाव?

## काँग्रेसची निवडणूक आयोगाकडे चौकशीची मागणी

।बंगळुरू। महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**विधानसभा निवडणूक लढविणाऱ्या काँग्रेस उमेदवारांनी दाखल केलेल्या अर्जामधील त्रुटी शोधाव्यात आणि भाजपच्या उमेदवारांच्या उमेदवारी अर्जातील चुका सुधाराव्यात, यासाठी विविध जिल्ह्यांतील निवडणूक अधिकाऱ्यांना कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांच्या कार्यालयातून (सीएमओ) दूरध्वनी केले जात असल्याचा आरोप काँग्रेसने शनिवारी केला. निवडणूक आयोगाने या प्रकरणाची चौकशी करून तपासासाठी मुख्यमंत्री कार्यालयातील दूरध्वनींचा तपशील मागवावा, अशी मागणी कर्नाटकचे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष डी. के शिवकुमार यांनी पत्रकार परिषदेत केली. त्यांनी सौंदत्ती येल्लम्मा मतदारसंघाचे उदाहरण देत सांगितले, की काही भाजप उमेदवारांच्या अर्जात त्रुटी आहेत. मुख्यमंत्री कार्यालयातून थेट संबंधित अधिकाऱ्याला दूरध्वनीवरून बदल करण्याच्या सूचना देण्यात आल्या.**



कर्नाटक विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी दाखल करण्यापूर्वी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष डी. के. शिवकुमार यांनी काँग्रेसच्या बैठकीत उमेदवारांना 'बी फॉर्म' देताना लाच मागितल्याचा आरोप केंद्रीय मंत्री शोभा करंदलाजे यांनी केला. निवडणूक आयोगाने शिवकुमार यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी करून आयोगाकडे तक्रार दाखल करण्यात आली. करंदलाजे या राज्य निवडणूक व्यवस्थापन समितीच्या निमंत्रक आहेत.

शिवकुमार यांनी या आरोपांना प्रत्युत्तर देताना स्पष्ट केले, की आपला पक्ष भाजपप्रमाणे ४० टक्के दलाली घेत नाही. आम्ही फक्त पक्षासाठी निधी गोळा करत आहोत. आम्ही सर्वसाधारण उमेदवारांकडून दोन लाख रुपये आणि अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीतील उमेदवारांकडून एक लाख रुपये घेत आहोत.मतदारांना चांदीचे दिवे, मंत्र्यावर गुन्हा बिलगी विधानसभा मतदारसंघातून भाजपकडून रिंगणात असलेले मंत्री मुरुगेश निरानी यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २१.४५ लाख रुपयांचे ९६३ चांदीचे दिवे जप्त करण्यात आले आहेत. मतदारांना लाच देण्याचा हा प्रकार असल्याचा ठपका निरानी यांच्यावर ठेवण्यात आला आहे. उद्योग मंत्रालयाचा कारभार सांभाळत असलेल्या निरानी यांच्याविरोधात मुधोळ पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

# 'बाजीराव' येतोय 'मस्तानी'सोबत !

बॉलिवूड सुपरस्टार अजय देवगणचे नाव इंडस्ट्रीतील सर्वात दमदार अभिनेत्यांपैकी एक आहे. अजय देवगणचा सर्वोत्कृष्ट चित्रपट सिंघमने प्रेक्षकांचे खुपच मनोरंजन केले आहे. अजयचा आतापर्यंत सिंघम आणि सिंघम रिटर्न्स हे बॉक्स ऑफिसवर चांगलेच गाजले.

यापूर्वी, दिग्दर्शक रोहित शेट्टीने अजय देवगण स्टारर 'सिंघम अगेन'च्या तिसऱ्या भागाची घोषणा केली होती. त्यानंतर या चित्रपटाची अपडेट जाणुन घेण्यासाठी प्रेक्षक उत्सूक आहेत.

सिंघम ३ साठी प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता आहे. या चित्रपटाची चाहते आतुरतेने वाट पाहत होते. दरम्यान, या चित्रपटाबाबत एक मोठी बातमी समोर आली आहे. बऱ्याच दिवसांनंतर निर्मात्यांनी या चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख जाहीर केली आहे.

त्यासोबतच या चित्रपटाबाबत एक अपडेट असेही आहे की यावेळी अजय देवगणसोबत 'सिंघम ३' मध्ये दीपिका पदुकोण देखील दिसणार आहे.

समीक्षक आणि व्यापार विश्लेषक तरण आदर्श यांनी नुकतीच सोशल मीडियावर याबाबत माहिती दिली आहे. तरणने ट्विट केले आहे की हा चित्रपट 2024 च्या स्वातंत्र्यदिनी प्रदर्शित होणार आहे.

या चित्रपटात अजय देवगण पुन्हा एकदा बाजीराव सिंघमच्या दमदार भूमिकेत दिसणार आहे. सिंघमच्या दोन्ही भागांनी प्रेक्षकांच्या मनात चांगली जागा निर्माण केली होती, त्यानंतर चाहत्यांना तिसऱ्या भागाची प्रतीक्षा आहे.




# नागार्जूनच्या मुलाने उर्वशी रौतेलाला दिला होता त्रास?

अभिनेत्री उर्वशी रौतेला सध्या सोशल मीडियावर सतत चर्चेत असते. उर्वशी तिच्या सौंदर्य आणि स्टाईलमुळे प्रसिद्ध आहे. चित्रपटांपेक्षा वयक्तिक आयुष्यामुळेच उर्वशी नेहमी चर्चेत असते. सध्या उर्वशी वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आहे. तिच्याबद्दल खोट्या बातम्या पसरवल्या जात असल्यामुळे ती चिडली आहे. उर्वशीने युएईस्थित स्वयंघोषित चित्रपट समीक्षक उमैर संधूला मानहानीची नोटीस पाठवली आहे. दाक्षिणात्य अभिनेते नागार्जुन यांचा मुलगा अखिल अक्किनेनीने उर्वशीला 'एजंट' या चित्रपटाच्या सेटवर त्रास दिल्याचं वृत्त उमैरने दिलं होतं.



आता या वृत्ताविरोधात उर्वशीने कायदेशीर कारवाई करणार असल्याचं स्पष्ट केलं आहे. इन्स्टाग्रामवर पोस्ट करत तिने माहिती दिली आहे.उमैर संधूने उर्वशी आणि अखिल अक्किनेनी यांच्याविषयी एक पोस्ट लिहिली होती. अखिलने एजंट या चित्रपटाच्या सेटवर उर्वशीला त्रास दिला असल्याचं त्याने पोस्टमध्ये लिहिलं होतं. इतकंच नव्हे तर उर्वशीच्या मते अखिल हा बालिश कलाकार असून त्याच्यासोबत काम करताना अनेक अडचणी येत असल्याचेही पोस्टमध्ये लिहिलं होतं.

उमैरच्या या पोस्टनंतर उर्वशी चांगलीच संतापली आहे. 'माझ्या लीगल टीमकडून त्यांना मानहानीची नोटीस बजावण्यात आली आहे. अशा खोट्या ट्विट्समुळे तुमच्यासारख्या पत्रकारांवर मी नाराज आहे. तुम्ही माझे अधिकृत प्रवक्ते नाहीत. पण तुम्ही नक्कीच बालिश पत्रकार आहेत ज्याने मला आणि माझ्या कुटुंबीयांना त्रास दिला आहे' असे उर्वशीने पोस्ट करत सांगितले आहे.

उवर्शीच्या या पोस्टवर चाहते मोठ्या प्रमाणात कमेंट करताना दिसत आहेत. एका युजरने लिहिलं डम आम्ही तुमच्या पाठिशी आहोत' तर दुसऱ्याने तू खूप चांगलं केलंस म्हणत उवर्शीला पाठिंबा दिला आहे. बॉलिवूड सेलिब्रिटींबद्दल अशा प्रकारचे ट्विट्स करण्याची उमैर संधूची ही पहिलीच वेळ नाही. याआधीही त्याने बॉलिवूड सेलिब्रिटींबद्दल अशा प्रकारचे ट्विट्स केले आहेत. त्याने सेलिना जेटलीबद्दलही ट्वीट करत खळबळ माजवून दिली होती. सेलिना ही अशी एकमेव अभिनेत्री आहे, जिचे पिता फिरोज खान आणि मुलगा फरदीन खान यांच्याबरोबर शाररिक संबंध होते. या ट्विटनंतर सेलिना चांगलीच भडकली होती आणि तिने उमैर सडेतोड उत्तर दिले होते.

# सोशल मीडियावर सुनील शेट्टीच्या मुलीबाबत आक्षेपार्ह विधान

हिंदी चित्रपटसृष्टीतील तगड्या कलाकारांचा उल्लेख केला तर त्यात सुनील शेट्टीचे नावाचा समावेश होतो. सुनील शेट्टी त्याच्या अप्रतिम अभिनयासाठी आणि निर्दोष शैलीसाठी प्रसिद्ध आहे. दरम्यान, सुनील शेट्टीने सोशल मीडियाचा आयुष्यावर होणाऱ्या परिणामाबाबत खुलेपणाने सांगितले आहे. सोशल मीडिया हे कशाप्रकारे एखाद्याचं आयुष्य उद्ध्वस्त करू शकतं आणि त्यामुळेच बोलण्याची भीती वाटत असल्याचं त्यांनी सांगितलं. मुलगी अथिया शेट्टीला जेव्हा ट्रोल केलं जातं, तेव्हा खूप वाईट वाटत असल्याचीही भावना त्यांनी व्यक्त केली.नुकतचं सुनील शेट्टींनी 'द रणबीर' शोमध्ये हजेरी लावली होती. यावेळी सुनील शेट्टी यांना आधुनिक युगात सोशल मीडियाची वाढती क्रेझ आणि प्रभाव याबद्दल प्रश्न विचारण्यात आला. यावर सुनील शेट्टी म्हणाले की, 'सोशल मीडिया तुमचे आयुष्य उद्ध्वस्त करू शकतो. कधी-कधी ह्यामुळे मला जास्त बोलायला भीती वाटते. शेट्टी म्हणाले, "सध्याच्या सोशल मीडियाच्या काळात काहीच प्रायव्हसी शिल्लक राहिली नाही. त्यामुळे तुमचं आयुष्य उद्ध्वस्त होतं. एखादं वक्तव्य १५ विविध प्रकारे एडिट केलं जातं आणि त्याचे १५ विविध अर्थ काढले जातात. त्यामुळे मला मोकळेपणे बोलण्याचीही भीत वाटते."



# जिनिलीयाने उघड केलं लग्नानंतर सिनेसृष्टीपासून दूर राहण्याचं कारण

दक्षिणात्य, चित्रपट, मराठी सिनेसृष्टीतील एक लोकप्रिय अभिनेत्री म्हणजे जिनिलीया देशमुख. डिसेंबरमध्ये प्रदर्शित झालेल्या 'वेड' या चित्रपटातून तिने सिनेसृष्टीत पुनरागमन करत मराठी मनोरंजन सृष्टीत पाऊल टाकलं. लग्न झाल्यानंतर अनेक वर्ष ती मनोरंजन सृष्टीपासून दूर राहिली. आता तिने असं का केलं याचा खुलासा तिने केला आहे.रितेश आणि जिनिलीया नुकतेच करीना कपूरच्या चॅट शो 'व्हॉट वुमन वॉन्ट'मध्ये सहभागी झाले होते. या कार्यक्रमामध्ये त्या दोघांनी त्यांच्या नात्याविषयी अनेक गोष्टी मोकळेपणाने सांगितल्या. लग्न झाल्यानंतर रितेशने जिनिलीयाला काम करण्यासाठी मनाई केली होती असं काही वर्षांपूर्वी बोललं जात होतं. आता जिनिलीयानेच खरं काय ते सांगितलं.ती म्हणाली, "लग्नाआधी मी हिंदी, तेलुगू, तमिळ सिनेसृष्टीत खूप काम करत होते. लग्न झाल्यानंतर मला लग्नाला प्राधान्य द्यायचं होतं आणि तो पूर्णपणे माझा निर्णय होता. लग्नानंतर जेव्हा मी चित्रपटांमधून ब्रेक घेतला तेव्हा लोकांनी मला विविध प्रश्न विचारले. रितेशचे वडील राजकारणात असल्याने देशमुख कुटुंबीयांनी माझी फिल्मी कारकीर्द संपवली, असं अनेकांनी गृहीत धरलं. पण तसं काहीही झालं नाही. तुला चित्रपटांमध्ये काम करायला रितेशने मनाई केलीये का? असा प्रश्न मला विचारला गेला. तेव्हा दरवेळी एकच उत्तर द्यायचे की, नाही. मलाच दीर्घकाळ मनोरंजन सृष्टीपासून ब्रेक घ्यायचा आहे."

त्यावर रितेश म्हणाला, "कामातून ब्रेक घेणं हा सर्वस्वी तिचा निर्णय होता. तिला यापूर्वीच पुन्हा एकदा सिनेसृष्टीत पदार्पण करायचं होतं पण करोनामुळे ते लांबलं. मी तिला अनेकदा सांगायचो की तुझं कॅमेऱ्यासमोर असणं तू मिस करत आहेस त्यामुळे तू काम करायला



# मराठमोळ्या अजिंक्य रहाणेचा धमाका!

## वादळी अर्धशतक ठोकल्यानं सीएसकेच्या पदरी IPL मधील सर्वाधिक धावसंख्या

| चेन्नई |
महाईन्यूज | वृत्तसंस्था |

**आयपीएलचा १६ व्या हंगामातील ३३ वा सामना ईडन गार्डनमध्ये कोलकाता नाईट रायडर्स आणि चेन्नई सुपर किंग्ज यांच्यात होत आहे. कोलकाताने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर मैदानात उतरलेल्या चेन्नईच्या फलंदाजांनी केकेआरच्या गोलंदाजांचा अक्षरक्षा धुव्वा उडवला. विशेष म्हणजे सलामीला आलेला फलंदाज ऋतुराज गायकवाड बाद झाल्यानंतर अजिंक्य रहाणेनं पुन्हा एकदा यंदाच्या आयपीएलमध्ये चमकदार कामगिरी केली.**



मुंबईच्या वानखेडे मैदानात धावांचा पाऊस पाडणाऱ्या रहाणेनं आज ईडन गार्डनमध्येही वादळी अर्धशतक ठोकलं. रहाणेनं २९ चेंडूत ७१ धावांची नाबाद खेळी साकारल्याने चेन्नईला केकेआरविरुद्ध दोनशे धावांचा टप्पा पार करता आला. रहाणेनं ५ षटकार आणि ६ चौकार ठोकून केकेआरच्या गोलंदाजांचा समाचार घेतला. त्यामुळे चेन्नईनं २० षटकात ४ विकेट्स गमावत २३४ धावांपर्यंत मजल मारली. अजिंक्य रहाणे टीम इंडियात सलामीचा फलंदाज म्हणून ओळखला जातो. परंतु, गेल्या काही महिन्यांपासून रहाणे आंतराष्ट्रीय क्रिकेटपासून बाहेर आहे. पण यंदाच्या आयपीएल हंगामात अजिंक्य रहाणेनं फलंदाजीचं रुपडं बदललं असल्याचं पाहायला मिळत आहे. मैदानात ३६० डिग्री प्लेयरप्रमाणे आजच्या सामन्यात रहाणेनं फलंदाजी केली. रहाणेचा या आक्रमक फलंदाजीची शैली पाहून सर्वांच्याच भुवया उंचावल्या आहेत.ऋतुराजने २० चेंडूत ३५ धावांची खेळी साकारल्याने चेन्नईला पॉवर प्ले मध्ये चांगली सुरुवात मिळाली. कॉनवे अर्धशतकी खेळी करून बाद झाल्यानंतर अजिंक्य रहाणेनं मैदान गाजवलं. रहाणेनं केकेआरच्या गोलंदाजांचा समाचार घेत २९ चेंडूत ५ षटकार आणि ६ चौकार ठोकून ७१ धावांची नाबाद खेळी केली. त्यामुळे चेन्नईने २० षटकांत दोनशेचा टप्पा पार करत ४ विकेट्स गमावत कोलकाताला विजयासाठी २३६ धावांचं आव्हान दिलं आहे.

अजिंक्य रहाणे टीम इंडियात सलामीचा फलंदाज म्हणून ओळखला जातो. परंतु, गेल्या काही महिन्यांपासून रहाणे आंतराष्ट्रीय क्रिकेटपासून बाहेर आहे. पण यंदाच्या आयपीएल हंगामात अजिंक्य रहाणेनं फलंदाजीचं रुपडं बदललं असल्याचं पाहायला मिळत आहे. मैदानात ३६० डिग्री प्लेयरप्रमाणे आजच्या सामन्यात रहाणेनं फलंदाजी केली. रहाणेचा या आक्रमक फलंदाजीची शैली पाहून सर्वांच्याच भुवया उंचावल्या आहेत. ऋतुराजने २० चेंडूत ३५ धावांची खेळी साकारल्याने चेन्नईला पॉवर प्ले मध्ये चांगली सुरुवात मिळाली. कॉनवे अर्धशतकी खेळी करून बाद झाल्यानंतर अजिंक्य रहाणेनं मैदान गाजवलं. रहाणेनं केकेआरच्या गोलंदाजांचा समाचार घेत २९ चेंडूत ५ षटकार आणि ६ चौकार ठोकून ७१ धावांची नाबाद खेळी केली. त्यामुळे चेन्नईने २० षटकांत दोनशेचा टप्पा पार करत ४ विकेट्स गमावत कोलकाताला विजयासाठी २३६ धावांचं आव्हान दिलं आहे.

# हिटमॅन रोहित शर्माने आयपीएलमध्ये रचला इतिहास

## ‘हा’ कारनामा करणारा पहिलाच भारतीय

| हैदराबाद |
महाईन्यूज | वृत्तसंस्था |

**आयपीएल २०२३ च्या ३१ व्या सामन्यात मुंबई इंडियन्सला पंजाब किंग्जकडून १३ धावांनी पराभवाचा सामना करावा लागला असेल, परंतु संघाचा कर्णधार रोहित शर्माने या सामन्यात इतिहास रचला आहे. पीबीकेएसविरुद्ध हिटमॅनने २७ चेंडूत ४ चौकार आणि ३ गगनचुंबी षटकार मारत ४४ धावांची शानदार खेळी खेळली. या तीन षटकारांसह रोहित शर्माने आयपीएलमध्ये २५० षटकार पूर्ण केले. हा टप्पा गाठणारा रोहित पहिला भारतीय ठरला. होय, रोहित शर्मापूर्वी केवळ दोनच फलंदाजांनी आयपीएलमध्ये २५० षटकारांचा आकडा पार केला होता आणि ते दोघेही भारतीय खेळाडू नाहीत.**



आयपीएलच्या इतिहासात सर्वाधिक षटकार मारण्याचा विक्रम युनिव्हर्स बॉस ख्रिस गेलच्या नावावर आहे. वेस्ट इंडिजच्या या धडाकेबाज सलामीवीराने इंडियन प्रीमियर लीगमध्ये खेळलेल्या १४१ डावांमध्ये सर्वाधिक ३४७ षटकार मारले आहेत.

दुसरीकडे, २५१ षटकार मारण्याचा विक्रम एबी डिव्हिलियर्सच्या नावावर आहे. हे दोन्ही फलंदाज आता आयपीएल खेळत नाहीत, त्यामुळे रोहितला आयपीएलमध्ये सिक्सर किंग बनण्याची मोठी संधी आहे.

भारतीय खेळाडूंबद्दल बोलायचे झाले, तर रोहित शर्मा आता २५० षटकारांसह अव्वल स्थानावर आहे. त्याच्या खालोखाल चेन्नई सुपर किंग्जचा कर्णधार महेंद्रसिंग धोनी दुसऱ्या तर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा स्टार फलंदाज विराट कोहली तिसऱ्या क्रमांकावर आहे.

आयपीएलच्या इतिहासात सर्वाधिक षटकार मारणारे खेळाडू –

ख्रिस गेल – ३५७
एबी डिव्हिलियर्स – २५१
रोहित शर्मा – २५०*
एमएस धोनी – २३५
विराट कोहली – २२९

प्रत्युत्तरात मुंबईचा संघ २० षटकांत ६ गडी गमावून २०१ धावाच करू शकला. कॅमेरून ग्रीनने ४३ चेंडूत ६७ धावा, सूर्यकुमार यादवने २६ चेंडूत ५७ धावा आणि कर्णधार रोहित शर्माने २७ चेंडूत ४४ धावा केल्या. त्याचबरोबर पंजाब किंग्जकडून अर्शदीप सिंगने शानदार गोलंदाजी केली. त्याने ४ षटकांत २९ धावा देत ४ विकेट घेतल्या. त्याने शेवटच्या षटकात फक्त दोन धावा दिल्या.

### मुंबई इंडियन्स विरुद्ध पंजाब किंग्जचा सामना कसा राहिला?

**या सामन्यात एमआयचा कर्णधार रोहित शर्माने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. पहिल्या १० षटकांमध्ये पंजाबने ४ विकेट गमावल्या होत्या, तोपर्यंत रोहित शर्माचा निर्णय योग्य असल्याचे दिसत होते, परंतु त्यानंतर कर्णधार सॅम करनने हरप्रीत सिंग आणि इतर खेळाडूंसोबत धावगती वाढवल्याने मुंबईच्या अडचणी वाढल्या. सॅम करनने ५५ धावांची शानदार खेळी करत संघाला २१४ धावांपर्यंत नेले.**